**समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ७ दौंड यांचे कार्यालय**
दौंड - कुरकूंभ रोड, तालुका दौंड, जि. पुणे. पिन- ४१३८०१.
ईमेल- cmdt.srpf७.daund@mahapolice.gov.in
दुरध्वनी क्र.- ९८९००५२२६७ .

जा.क्र. समा/रारापोबल/गट-७/सपोशि भरती २०२२-२३/4287/२०२४ दौंड, दिनांक :-18/०७/२०२४.

**विषय :- सशस्त्र पोलीस शिपाई भरती २०२२-२०२३**
**उमेदवारांना लेखी परीक्षेबाबत सुचना...**

--OOOO--

उपरोक्त विषयान्वये, राज्य राखीव पोलीस बल गट क्र ७ दौंड या गट आस्थापनेवर एकुण २२४ पदांकरीता सशस्त्र पोलीस शिपाई भरती सन २०२२-२०२३ प्रक्रिया सुरु आहे. सदर भरती प्रक्रियेकरीता पात्र उमेदवारांची दिनांक १९.०६.२०२४ ते दिनांक ०२.०७.२०२४ या कालावधीमध्ये शारिरीक मोजमाप, मैदानी चाचणी व शैक्षणिक कागदपत्रे पडताळणी या गटाचे कवायत मैदान या ठिकाणी घेण्यात आली होती.

त्याअनुषंगाने पात्र उमेदवारांना मैदानी चाचणीमध्ये प्राप्त झालेल्या गुणांच्या गुणवत्तेनुसार लेखी परीक्षेकरीता तयार करणेत आलेली प्रवर्गनिहाय अंतिम निवड यादी उमेदवारांच्या माहितीकरीता www.mahapolice.gov.in आणि www.maharashtrasrpf.gov.in या संकेतस्थळावर तसेच समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र ७ दौंड या कार्यालयाचे मुख्यप्रवेशद्वार येथील नोटीस बोर्डवर रविवार दिनांक ०७/०७/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

**राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ७ दौंड लेखी परीक्षा बाबतची माहिती खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | लेखी परीक्षा दिनांक | प्रत्यक्ष हजर वेळ | लेखी परीक्षा ठिकाण |
|---|---|---|---|
| ०१ | **२१/०७/२०२४** | **सकाळी ०८.०० वाजता** | दत्तकला ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशन फॅकल्टी ऑफ मॅनेजमेंट कॉलेज, गट नं. ५४१/२, पुणे सोलापुर हायवे, मु.पो. स्वामी चिंचोली (भिगवन) ता. दौंड जि. पुणे. पिन कोड नं. ४१३१३० |

उमेदवार वरील नमुदप्रमाणे लेखी परीक्षेकरीता नियुक्त करणेत आलेले परीक्षा केंद्र, दिनांक व वेळत उपस्थित न राहिलेस गैरहजर उमेदवारांना सशस्त्र पोलीस शिपाई भरती २०२२-२०२३ प्रक्रियेतुन अपात्र करणेत येईल. तसेच उमेदवारांना लेखी परीक्षेकरीता पॅड व काळा बॉल पेन आमचे कार्यालयाकडुन पुरविणेत येणार आहेत. उमेदवारांनी परीक्षेकरीता येताना सोबत मैदानी चाचणीचे वेळी दिलेले ओळखपत्र तसेच लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र (हॉल तिकीट), आवेदन अर्ज, पासपोर्ट साइज फोटो व मुळ आधारकार्ड आणावे. याव्यतिरिक्त कॅलक्युलेटर, स्मार्टवॉच, मोबाईल फोन, ब्लुटुथ, ईअरफोन, Hearing Aide Device किंवा इतर कोणतीही संशयास्पद वस्तु सोबत बाळगु नये. याची कृपया सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**( राजलक्ष्मी शिवणकर )**
समादेशक
तथा
भरती अध्यक्ष
राज्य राखीव पोलीस बल गट क्र ७ दौंड

Scanned with OKEN Scanner